# ब्रिटिश कालीन भारतातील प्रबोधनाची ऐतिहासिक मिमांसा

**प्रा. डॉ. कालिदास गणपतराव सूर्यवंशी**
विभाग प्रमुख, इतिहास विभाग
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना.

इ.स.१७५७ च्या प्लासीच्या लढाईने भारतात ब्रिटिश सत्तेचा पाया रोवला गेला. ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीच्या सत्तेच्या या काळात भारतात अनेक बदल घडून आले. युरोपियन राष्ट्राच्या भारतातील वसाहती स्थापन करण्याच्या स्पर्धेत पोर्तुगीज, डंच मागे पडल्यानंतर ब्रिटिश फ्रेंच संघर्ष झाला या सर्वावर मात करून ब्रिटिशांनी एतदेशिय सत्ता बरोबर झालेल्या लढाया मध्ये विजय मिळविला. १८१८ पर्यंत जवळजवळ संपूर्ण भारत ब्रिटिशांनी आपल्या ताब्यात आणला. या काळात त्यांनी ज्या सुधारणा केल्या त्याचे सामाजिक, राजकीय, धार्मिक, वैचारिक, सांस्कृतिक आदी क्षेत्रामध्ये प्रबोधनाची सुरुवात झाली.

**सामाजिक परिस्थिती :-**

ब्रिटिशांच्या भारतातील सत्ता स्थापनेनंतर भारतात वैचारिक जागृती घडून येऊ लागली. त्यामुळे भारतीय समाजात फार मोठे परिवर्तन घडवून येऊ लागले. ब्रिटिशांच्या सत्ता स्थापनेपूर्वी भारतीय समाज मागासलेला होता. या ब्रिटिश दृष्टिकोनाचा प्रभाव दिसून येतो. तत्कालीन ब्रिटिशांनी भारतीय समाज मागासलेला आहे, असे म्हटले असले तरी एतदेशिय समाज सुधारकांचा हाच सूर आपल्याला पाहायला मिळतो. काहींना हे मत मान्य नसले तरी भारतीय समाजात मूलभूत परिवर्तनाचा अभाव होता ही बाब आपल्याला मान्य करावी लागेल.[१]

सामाजिक क्षेत्रामध्ये धर्म रूढी यांच्या मुळे जाती व्यवस्था, कुटुंब व्यवस्था व विवाह संस्था यांच्यावर फार मोठी बंधने आली होती. जातीचा व्यवसाय ठरलेला असे. आपल्या जातीचा व्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय केल्यास त्या व्यक्तीला आपल्या जातवाल्याचा व ती व्यक्ती ज्या जातीचा व्यवसाय करेल त्या जातीच्या लोकांच्या रोषाला बळी पडावे लागत असे. जात ही जन्मानुसार एत व्यक्तीवर अनेक बंधने लादले होते.[२]

कंपनी सरकारने केलेले समाज सुधारणा कायदे १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात कंपनी सरकारने विविध कायदे संमत करून हिंदू समाजातील काही अनिष्ट चालीरीती बंद करण्याचा प्रयत्न केला. लॉर्ड बेंटींकचा काळ तर सामाजिक सुधारणेचे नवे युग म्हटले जाते. प्रजेचे कल्याण आणि शांतता प्रस्थापित करणे असे बेंटींकचे धोरण होते. त्याची राजवट शहाणपणाची व जनकल्याणाची ठरली.[३]

**१८१७ चा कायदा :-**

बनारसच्या ब्राह्मणांना जे काही खास अधिकार होते त्या अधिकारात ते इतरांना काही विशिष्ट गुन्ह्याबद्दल देह दंडाची शिक्षा देत असत. त्या संदर्भात कायदा करून हा त्यांचा अधिकार रद्दबातल ठरविण्यात आला. १८२९ चा कायदा हा सती बंदीचा कायदा आहे. सती जाण्यामागची प्राचीनकालीन भूमिका उदात्त असली तरी या काळापर्यंत त्या चालीला विकृत रूप प्राप्त झालेले होते. पती निधनानंतर त्यांच्या पत्नीने स्वतःला त्यांच्या चितेवर जाळून घेण्याची अमानुष चाल रूढ होती. अशावेळी कालबाह्य झालेल्या या चालीचे उच्चाटन करणे आवश्यक होते जे या कायद्याने केले.[४]

**१८३२ चा कायदा :-**

हिंदू धर्म शास्त्रानुसार एखाद्याने धर्म बदलला तरी त्याचा संपत्तीवरील हक्क नाहीसा होत असे परंतु या कायद्याने धर्म बदलला तरी त्याचा संपत्तीवरील हक्क कायम या कायद्याद्वारे स्थापित केलं. १८३६ या कायद्यापूर्वी भारतातील राजे लोकांच्या पदरी पुष्कळ शिपाई असत. पुढे त्यातील अनेक शिपाई बेकार झाल्याने जंगलात, डोंगराळ भागात आश्रय घेत तेथून जाणाऱ्या येणाऱ्या ना प्रवाशांना लुटीत असत किंवा त्यांचा खून करत असत काही वेळेला देवाला नरबळी दिला जात असे हे लोक ठग या नावाने प्रसिद्ध होते तेव्हा त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी या कायद्याची निर्मिती करण्यात आली होती. सतत प्रयत्न करून संपूर्णपणे ठगाचा बंदोबस्त करण्यात आला अनेकांना वेदनाच्या शिक्षा झाल्या आणि अशा पद्धतीने ही अमानुष पद्धत बंद झाली.[५]

**१८४० चा कायदा :-**

या कायद्यानुसार हिंदू मुसलमान यांच्या यात्रा समई जो कर वसूल केला जात असे तो यात्रा कर रद्द करण्यात आला. १८४३ चा कायदा त्याकाळी भारतात जमीनदार, सरदार, उमराव हे वेठबिगार पद्धतीने गोरगरिबांना राबवून घेत असत. अशा वेठ बिगाराच्या संपूर्ण जीवनावर जमीनदाराचा हक्क असे हे एक प्रकारे गुलामगिरी होती या कायद्याने हे मानवी गुलामगिरीची पद्धत बंद करण्यात आली.[६]

**१८५६ चा कायदा :-**

हिंदू धर्मशास्त्रानुसार हिंदू विधवा स्त्रीला पुनर्विवाह करण्यास परवानगी नव्हती. समाजात बालविवाह पद्धत अस्तित्वात होती. त्यामुळे विधवाचे आयुष्य कठीण होत असे. परितक्त्या स्त्रीचे जीवन फारच कष्टप्रद  असे तिला अमानुषतेने वागविले जाई प्रामुख्याने बंगाल, महाराष्ट्र आणि इतर प्रांतात ही पद्धत बऱ्यापैकी चालू होती. ही परिस्थिती सुधारण्यासाठी कायदा करण्यात आला त्यानुसार विधवांना पुनर्विवाहास परवानगी देण्यात आली. समाज सुधारण्यासाठी आवश्यक असणारी मानसिकता निर्माण होण्यात अशा कायद्याचा उपयोग झाला.[७]

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

**पाश्चात्य शिक्षण :-**

भारतात प्राचीन काळापासून अनेक प्रकारच्या कला, विद्या, भाषा, शास्त्र, वैज्ञानिक विषय यात मोठी प्रगती झालेली होती. हा ज्ञानाचा वारसा परंपरेने चालत आलेला होता. सुरुवातीला गुरुकुल पद्धत होती. खेड्यापाड्यात पंतोजीच्या शाळा असायच्या मुसलमानी अंमल आल्यानंतर या शाळेच्या जोडीला मदर्स शाळा आल्या आणि नंतर ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्यानंतर यामध्ये बदलास सुरुवात झाली. परंपरेनुसार चालत आलेल्या शिक्षण पद्धतीनुसार लिहिणे, वाचणे यासाठी दिले जाणारे शिक्षण, शारीरिक शिक्षण अशी पद्धती रूढ होती.[८]

**शिक्षण विषयक सुधारणा:-**

भारतात इंग्रजांची राज्य स्थापन झाल्यानंतर लोकांना शिक्षण द्यावे की नाही द्यावे हा प्रश्न प्रथम त्यांच्यासमोर होता. सन १७१८ मध्ये मुंबईत एक शाळा विनामूल्य तत्त्वावर सुरू झाली होती यापुढील काळात मिशनरी शाळांची संख्या वाढत गेली. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात मात्र अल्प प्रमाणातील सरकारी मदत व खाजगी प्रयत्न यामुळे शाळांचे संख्या झपाट्याने वाढत गेली. वॉरन हेस्टिंग्ज, लॉर्ड हेस्टिंग्ज इत्यादींनी पौर्वात्य वाङमयाच्या अभ्यासाचा पुरस्कार केला होता. या नवीन शाळेतून कोणत्या भाषेतून शिक्षण द्यावे याबद्दल कंपनीच्या अधिकाऱ्यांमध्ये मत भिन्नता होती. संस्कृत, फारशी या भाषा रूढ शास्त्राचा अभ्यास व्हावा असा एक विचार प्रवाह होता. याउलट युरोपीय पद्धतीनुसार भाषा साहित्य व आधुनिक विज्ञान हे विषय शिकविले जावेद असाही एक प्रवाह होता.[९]

सुरुवातीच्या काळात शाळा काढणाऱ्यांचा हेतू काहीही असला तरी कालांतराने मात्र पाश्चात्य शिक्षण पद्धतीने स्वीकारलेले तत्व भारतातही लागू करण्यात आले. या शिक्षण पद्धतीनुसार शिक्षणाचा धर्मशास्त्राचे असलेला संबंध नाहीसा करण्यात आला. आधुनिक शिक्षण पद्धतीचा पुरस्कार करण्यात आला. त्यानुसार राज्यशास्त्र, इतिहास, भूगोल, गणित शास्त्र, विज्ञान इत्यादी विषय शिकविले जाऊ लागले. या विषयाचा अभ्यास करण्याची भारतीयांना चांगली संधी प्राप्त झाली. जागतिक इतिहासाचा अभ्यासाचा समावेश झाल्याने इंग्लंडमधील लोकशाहीचा विकास अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध, फ्रेंच राज्यक्रांती, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय याचा प्रभाव दिसून येत गेला त्यातून सुरक्षिताच्या नव विचारांना चालना मिळत गेली असे दिसते.[१०]

**शाळाची स्थापना व वाढ :-**

इ.स.१७८१ मध्ये वॉरन हेस्टिंग्जने एक खाजगी शाळा कलकत्याला सुरू केली. त्यातून अरबी, फारशी, इस्लामी कायद्याचे अभ्यास विषय शिकविले जात. बनारसला जोनाथन डंकनने इ.स. १७९१ मध्ये संस्कृत कॉलेज नावाचे शिक्षण संस्था स्थापन केली. या संस्थेला सरकारचे अनुदान मिळत होते. विल्यम जॉन्सनने १७८४ मध्ये एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल ही प्राच्य विद्या संशोधनाला उत्तेजन देणारी संस्था स्थापन केली. या संस्थेतून संस्कृत भाषा आणि प्राचीन वाङ्मयाचा अभ्यास सुरू झाला. १८१३ पर्यंत

भारतीयांना पाश्चात्य शिक्षण द्यावे हा विचार मान्य झालेला नव्हता.[११] माउंट स्टअर्ट एलीफिन्स्टनची मुंबई प्रांतांचा पहिला गव्हर्नर म्हणून १८१९ मध्ये नेमणूक झाली. त्याआधी पुणे, नागपूर, पुन्हा पुणे येथे रेसिडेंट म्हणून त्याने काम पाहिले होते. त्याने भारतीयांसाठी उदारमतवादी शिक्षणाचा पुरस्कार केला. धार्मिक कार्यासाठी इंग्रजी शिक्षण देण्यापेक्षा सर्व विद्या शाखेचे व्यापक शिक्षण दिले जावे म्हणून त्याने पाठिंबा दिला. त्याने त्यासाठी आर्थिक मदत देण्याचे ठरविले होते. त्याचा हा मानवतावादी उदार दृष्टीकोन त्यावेळच्या विचारवंतांना व बुद्धिमत्तांना स्वागतार्य वाटला. त्यांनी या संधीचा फायदा घेऊन भारतीयांना धर्मनिरपेक्ष ज्ञान देण्यासाठी शाळा सुरू केल्या. धर्मनिरपेक्ष व ऐहिक ज्ञानामुळे भारतातील लोकांना विज्ञानाचा वैज्ञानिक पद्धतीचा परिचय होऊन त्यांच्यातील अंधश्रद्धा कमी होतील अज्ञान रोगराई, दारिद्य यासारख्या अनिष्ट गोष्टी पासून मुक्ती मिळेल असे वाटत होते.[१२]

लॉर्ड बेटींक गव्हर्नर जनरल असताना एतदेशीयाच्या शिक्षणाचा प्रश्न त्यांच्यासमोर आला. तेव्हा लॉर्ड मेकॉलेच्या मदतीने बेटींकने शिक्षणाचा प्रश्न हाती घेतला. भारतीय लोकास सज्ञान करून त्यांच्यावर राज्य करणे चांगले की त्यात अज्ञानी ठेवून राज्य करणे चांगले असा प्रश्न त्यांच्यासमोर होता. त्याचप्रमाणे येथील लोकांना प्राच्यविद्या शिकविणे चांगले की पाश्चात्य शिक्षण पद्धती लागू करणे चांगले हाही प्रश्न त्यांच्यापुढे होता. तेव्हा या प्रश्नावर विचार विनिमय करण्यासाठी त्यांनी एक कमिटी नेमली त्या कमिटीत होरेस विल्सन, सर चार्लस टिव्हिलियन, ग्रँड डफ, लॉर्ड मेकॉले ही विद्वान मंडळी नियुक्त केली.[१३] भारतीयांना पाश्चात्य शिक्षण आणि तेही इंग्रजीतून द्यावे असे ठरले. या मताचा लॉर्ड मेकॉलेने जोरदार पुरस्कार केला. १८३५ पासून इंग्रजी भाषेतून पाश्चात्य शिक्षण सर्व शाळातून देण्यास सुरुवात झाली. शाळा महाविद्यालयातून शिक्षण घेणाऱ्यास सरकारी नोकऱ्या देण्यात येतील असे सरकारने जाहीर केले. यातूनच शाळा कॉलेजातून शिक्षण घेण्याची भारतीयांची मानसिकता तयार होत गेली. शिक्षण घेणाऱ्यांची संख्या जसजशी वाढू लागली तस तशी नवीन शाळा सुरू करण्यावर भर दिला जाऊ लागला. यातूनच आधुनिक भारतीय शिक्षण पद्धतीचा पाया घातला गेला त्याचे श्रेय चार्लस वूड या ब्रिटिश अधिकाऱ्याला जाते. लॉर्ड डलहौसी भारताचा गव्हर्नर जनरल तेव्हा त्याने शिक्षण विषयक एक समिती गठित केली त्या समितीचा अध्यक्ष सर चार्लस वूड हा होता. या समितीने १९ जुलै १८५४ मध्ये आपला आव्हान सादर केला तोच अवहाल वूड या खलितामधून प्रसिद्ध आहे.[१४]

**संदर्भसूची :-**

१. कोटेकर शांता - आधुनिक भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, जून २०१३, पृष्ठ क्रमांक २१२.

२. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक २२८.

३. सरकार सुमित - आधुनिक भारताचा इतिहास, राजकमल प्रकाशन नई दिल्ली, १९९२, पृष्ठ क्रमांक ३११.

४. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक ३१७.

५. गोपाल एस, अनुवाद देशपांडे सरोज- ब्रिटिशांची भारतातील राजनीति, डायमंड प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे २००६, पृष्ठ क्रमांक २७२.

६. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक ३०९.

७. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक ३१८.

८. आचार्य जावडेकर श. द. - आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे ३०, १९९४, पृष्ठ क्रमांक ४२२.

९. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक ४६८.

१०. डॉ. खन्ना कैलास - आधुनिक भारत का सामाजिक इतिहास, अर्जुन पब्लिसिंग हाऊस, दरिया गंज, नई दिल्ली २००४, पोस्ट क्रमांक ४९, ५०.

११. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक ७२, ७३.

१२. डॉ. ग्रोवर बी एल, डॉ. बेल्हेकर एन के - आधुनिक भारताचा इतिहास, एस चंद अँड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड रामनगर, दिल्ली २००८, पृष्ठ क्रमांक ३९८.

१३. उपरोक्त - पृष्ठ क्रमांक ४०९.

१४. आचार्य जावडेकर श. द. - आधुनिक भारत कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे ३०, १९९४, पृष्ठ क्रमांक ४३८.